ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

No,CGRF/AZ/ U / 245 / 2009 /79 / Date :-

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect of Smt. Vodhyullata Madhav Gurjar,Plot No.43, "GANGA"Nivas, Garkheda, Chaatrapati Nagar, Malhar Chowk, Aurangabad, (Consumer No. 490011010480)*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from forwarding of grievance in respect of Smt. Vodhyullata Madhav Gurjar,Plot No.43, "GANGA"Nivas, Garkheda, Chaatrapati Nagar, Malhar Chowk, Aurangabad,*

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 22.09.2009 at 11= 30 Hrs. onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

*Copy to:*
*Smt. Vodhyullata Madhav*
*Gurjar,Plot No.43,*
*"GANGA"Nivas, Garkheda,*
*Chaatrapati Nagar, Malhar Chowk,*
*Aurangabad,*

## ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२४५/२००९/७९**

**तक्रार दाखल दिनांक :- ०८/०९/२००९**
**निकाल दिनांक :- ०५/१०/२००९**

**सौ. व्ही. एम. गुजर,**
**प्लॉट नंबर ४३ गंगा निवास,गारखेडा,**
**छत्रपती नगर,मल्हार चौक,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११०१०४८०) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०८/०९/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २२/०९/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी विद्युत पुरवठा घेतला आहे.त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००११०१०४८० हा आहे. ग्राहकाच्या घराला कुलुप नसतांना व घर बंद नसतांना देखिल माहे फेब्रुवारी २००८ ते जुन २००८ तसेच आक्टोबर २००८ ते डिसेंबर २००८ या कालावधी करीता लॉकचे वीज बिल देण्यात आले. त्यामुळे त्यांना कमी / ज्यास्त रक्कमेची वीज देयके प्राप्त होत असुन त्यांनी भरणा केलेल्या रकमेचे क्रेडीट व्यवस्थीत देण्यात येत नाही.तसेच अंतिम तारखेपुर्वी वीज देयक प्राप्त होत नाहीत व त्यामुळे कंपनीने जाहीर केलेल्या सवलतीचा फायदा घेता येत नाही. दर महीन्यात रिडींग नुसार देयक मिळण्याबाबत संबंधीत कार्यालयाकडे वारंवार तोंडी व लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. परंतु त्यावर कारवाई होत नसल्यामुळे ग्राहकाने मंचात तक्रार दाखल केली आहे.

२) दिनांक २२/०९/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर, श्री कन्नम सहाय्यक लेखापाल गारखेडा उपविभाग व विज ग्राहक सौ. व्ही.एम.गुजर उपस्थित होते. ग्राहकाने विद्युत मिटर घराच्या बाहेर असल्यानंतरही वारंवार लॉक स्टेटची देयक देण्याबाबतची तक्रार केली. तसेच माहे २००८ चे देयक भरल्यानंतरही जानेवारी २००९ देयकामध्ये अवास्तव थकबाकी दाखविण्यात आल्याचे सांगीतले. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचे सी.पी.एल.,स्थळ निरिक्षण अहवाल व उपकार्यकारी अभियंता गारखेडा यांचे पत्र सादर केले. ग्राहकास वरील कालावधीमध्ये लॉक स्टेटस देवुन सरासरीवर आधारीत देयक देण्यात आल्याचे मान्य करुन व रिडींग प्राप्त

झाल्यानंतर वापलेल्या युनिटचे योग्य समायोजन करुन बिलामध्ये क्रेडीट देण्यात आल्याचे नोडल अधिकारी यांनी सांगीतले.ग्राहकाने दिनांक १९/१२/२००८ पासुन वीज देयकाचा भरणा केला नसल्यामुळे माहे ऑगस्ट २००९ अखेर ग्राहकाकडे रुपये ८२४३ थकबाकी प्रलंबीत असल्याचे सांगीतले. सी.पी.एल.वर लॉक क्रेडीट व्यवस्थीत दिसत नसल्यामुळे नोडल अधिकारी यांना माहे जानेवारी २००९ मध्ये देण्यात आलेल्या देयकाचे सखोल विवरण सादर करण्यास सांगीतले.तसेच या मंचाचे पुढील आदेशा पर्यंत ग्राहकाचा विद्युत पुरवठा खंडीत करु नये अशा सुचना देवुन प्रकरण निकालासाठी ठेवण्यात आले.

३) दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागदपत्रा वरुन असे आढळुन येते की, ग्राहकास माहे फेब्रुवारी २००८ ते जुन २००८ व ऑक्टोबर २००८ व डिसेंबर २००८ या कालावधीमध्ये घर बंद दाखवत लॉक स्टेटस नुसार सरासरीवर आधारीत वीज देयक देण्यात आले आहे.ग्राहकाने त्याबाबत महावितरणच्या संबंधीत कार्यालयाकडे दिनांक ०४/०७/०९, १५/०३/०९ तसेच २०/०७/२००९ रोजी लेखी अर्ज सादर करुन तक्रार दाखल केली आहे. सी.पी.एल.नुसार माहे जुलै २००८ व जानेवारी २००९ मध्ये रिडींग प्राप्त झाल्यानंतर एकत्रीत युनिट चे समायोजन करुन लॉक क्रेडीट देण्यात आल्याचे आढळुन येते. ग्राहकाने दिनांक १९/१२/२००८ पासुन वीज देयकाचा भरणा केला नसल्यामुळे त्यांच्याकडे ऑगस्ट २००८ प्रलंबित असलेले वीज देयक रुपये ८२४३ योग्य आहे.कनिष्ठ अभियंता गारखेडा यांनी सादर केलेल्या स्थळ निरिक्षण अहवालात ग्राहकाचे मिटर घराच्या बाहेरील भिंतीवर रिडींग घेण्यायोग्य जागी बसविलेले असुन सहज दर्शनी भागात बसविले आहे असा शेरा दिला आहे. तसेच उपकार्यकारी अभियंता गारखेडा यांनी सुध्दा संबंधित फोटो रिडींग एजंसीचे व्यवस्थापकास पत्र लिहुन वरील ग्राहकाचे रिडींग घेण्याबाबत सुचना दिलेल्या असल्याचे आढळुन येते.फोटो रिडींग बाबत तसेच ग्राहकास अंतिम तारखेपर्यंत देयक मिळत नसल्याबाबत च्या ब-याच तक्रारी यापुर्वी या मंचात दाखल झालेल्या आहेत.

वरील सेवेमध्ये सुधारणा करण्याकरीता फोटो बिलींग एंजसीला केवळ पत्र लिहुन अथवा नाममात्र दंड करुन परीस्थीतीमध्ये सुधारणा होणार नाही त्याकरीता महावितरण कंपनीने जाणिव पुर्वक लक्ष घालुन ग्राहकाच्या वरील सेवेमध्ये सुधारणा करावी असे या मंचाचे मत आहे.

४) वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर अर्जदाराने महावितरणतर्फे माहे जानेवारी २००९ मध्ये दिलेल्या देयकातुन त्यांने दिनांक १९/१२/२००८ रोजी भरलेल्या देयकाचे समायोजन झाले नाही.या गैरसमजुतीमुळे मंचात तक्रार दाखल केली असल्याचे दिसुन येते.

## आदेश

१) महावितरण कंपनीतर्फे ग्राहकास देण्यात आलेले माहे ऑगस्ट २००८ चे देयक योग्य असुन त्याचा भरणा हा आदेश मिळाल्यापासुन सात दिवसाच्या आत करावा.

२) महावितरण कंपनीने ग्राहकाच्या मिटर रिडींग बाबत महाराष्ट्र नियामक आयोग, विनियम २००५ चे कलम १४.३ चे पालन करावे.

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विष्णु अं. हंबिरे**
**अध्यक्ष**

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२४५/२००९/७९** **दिनांक :-**

**प्रति,**

सौ. व्ही. एम. गुजर,
प्लॉट नंबर ४३ गंगा निवास,गारखेडा,
छत्रपती नगर,मल्हार चौक,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११०१०४८०)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/२४५/२००९/७९ )

आपण दिनांक ०८/०९/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती,सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.